आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१३ नोव्हेंबर २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आयुष्मान भारत योजनेमुळे जनतेच्या सुमारे सव्वा लाख कोटी रुपयांची बचत झाली असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन / बिहारमधे १२ हजार कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांची प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पायाभरणी आणि लोकार्पण

- झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी मतदानाला प्रारंभ, सकाळी ११ वाजेपर्यंत २९ पूर्णांक ३१ शतांश टक्के मतदान

- महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक प्रचार शिगेला सर्व पक्षीय नेत्यांच्या ठिकठिकाणी सभा

- बुलडोझर कारवाई द्वारे आरोपीला शिक्षा देऊन न्यायालयाची भूमिका बजावण्याचा सरकारला अधिकार नाही, असा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

**आणि**

- भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका संघांदरम्यान टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला तिसरा सामना आज सेंचुरियन इथं रंगणार

**<><><><><>**

सरकार जनतेच्या सेवेसाठी समर्पित  असून याच उद्देशानं सुरू केलेल्या आयुष्मान भारत योजनेमुळे जनतेच्या सुमारे सव्वा लाख कोटी रुपयांची बचत

झाली आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. बिहारमधल्या दरभंगा शहरात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज १२ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध विकास कामांची पायाभरणी आणि लोकार्पण झालं, त्यावेळी ते बोलत होते. प्रधानमंत्र्यांनी या कार्यक्रमात, सुमारे १२ अब्ज ६० कोटी रुपये खर्चून दरभंगा इथं बांधण्यात येणाऱ्या एम्सची पायाभरणी केली. तसंच विविध राष्ट्रीय महामार्ग आणि रेल्वे विकास योजनांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली. प्रधानमंत्र्यांनी यावेळी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून देशभरातल्या विविध रेल्वे स्थानकांवरच्या भारतीय जनऔषधी केंद्राचंही उद्घाटन केलं. तसंच पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू क्षेत्रातल्या योजनांची पायाभरणी देखील केली.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सध्या तीन दिवसांच्या दादरा, नगर हवेली आणि दीव दमण या केंद्रशासित प्रदेशाच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात आज राष्ट्रपतींच्या हस्ते आज सिल्वासा इथल्या झेंडा चौक शाळेचं उद्घाटन होणार आहे. झेंडा चौक शाळेचं संकुल अत्याधुनिक असून तिथं सुमारे १२ हजार विद्यार्थ्यांसाठी सर्व प्रकारच्या आधुनिक सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

राष्ट्रपती आज सिल्वासामधल्या नमो वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संस्थेला भेट देऊन तिथल्या प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. तसंच त्या दीव इथल्या आयएनएस खुक्री स्मारकाला भेट देतील.

<><><><><>

नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयातर्फे उद्यापासून ओदिशात भुवनेश्वर इथे दोन दिवसीय चिंतन शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे. या शिबिरात २०३० पर्यंत ५०० गिगावॅटचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आणि २०४७ पर्यंत १ हजार

८०० गिगावॅटच्या पुढील उद्दिष्टाच्या धोरणांवर चर्चा होणार आहे. केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या हस्ते या शिबिराचं उद्घाटन होणार आहे.

<><><><>

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात साठी १५ जिल्ह्यातल्या ४३ विधानसभा मतदारसंघांमधे  आज मतदान होत  आहे. सकाळी ७ वाजता मतदानाला सुरुवात झाली असून मतदानासाठी सर्वत्र कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यातल्या ३१ विधानसभा मतदार संघातली ९५० अतिसंवेदनशील मतदान केंद्र असून तिथं ४ वाजेपर्यंत मतदान सुरू राहील. भाजपचे माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन, राज्यसभा सदस्य महुआ माजी, काँग्रेस नेते रामेश्वर ओराओ आदि नेत्यांचं भवितव्य आज मतपेटीत बंद होणार आहे. सकाळी ११ वाजेपर्यंत २९ पूर्णांक ३१ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली.

<><><><>

केरळ मधल्या वायनाड लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीसाठी  आज मतदान होत आहे. काँग्रेसचे राहुल गांधी यांनी राजीनामा दिल्यामुळे ही पोटनिवडणूक होत असून  काँग्रेसतर्फे आता प्रियंका गांधी ही जागा लढवत आहेत. वायनाडमधे सकाळी ११ वाजेपर्यंत २७ पूर्णांक ४ शतांश टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

<><><><>

महाराष्ट्रात विधानसभा  निवडणुकीसाठी प्रचार जोरात सुरु आहे. सर्व पक्षांचे नेते राज्यभरात आजही ठिकठिकाणी प्रचारसभा घेत आहेत. केंद्रीय मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा धुळे, जळगाव आणि परभणी इथं सभा घेणार

आहेत. भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा मुंबई आणि अहिल्यानगरमध्ये प्रचार करणार आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सभा चंद्रपूर आणि नागपुरातल्या विविध मतदारसंघात होणार आहेत. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ वाशिम जिल्ह्यात कारंजा आणि ठाणे जिल्ह्यात उल्हासनगर तसंच मीरा भाईंदर इथं प्रचार करणार आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नांदेड, अकोला आणि नागपूर येथे प्रचार करणार आहेत. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले पुण्यात प्रचार करणार आहेत. शिवाय भाजप नेते शिवराज सिंह चौहान, पियुष गोयल, प्रमोद सावंत आणि ज्योतिरादित्य शिंदे राज्यात ठिकठिकाणी प्रचार करणार आहेत.

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे हे लातूर आणि सोलापूरमध्ये प्रचार करणार आहेत. तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी मुंबईत प्रचार करणार आहेत. काँग्रेस नेते सचिन पायलट हे चंद्रपूर, वर्धा आणि मुंबईत प्रचार करणार आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या सभा पुणे, नाशिक आणि अहिल्यानगरमध्ये होतील. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे आज सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या तीन मतदारसंघांत प्रचार करणार आहेत. तर आदित्य ठाकरे मुंबईत प्रचार करणार आहेत.  मनसे अध्यक्ष राज ठाकरे वरळीत प्रचार करणार आहेत.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज अहिल्यानगर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा, असं आवाहन अभिनेता संतोष पवार यांनी केलं आहे.....

**होल्ड--बाईट--(अभिनेता संतोष पवार) २७ सेकंद**

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीत दिव्यांग आणि ८५ वर्षांवरच्या ज्येष्ठ नागरिक मतदारांना मतदानाचा हक्क बजावत यावा यासाठी मुंबई जिल्हा निवडणूक यंत्रणेनं विशेष सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यामध्ये व्हीलचेअर, व्हॅन, ईको व्हॅन, दिव्यांग सुलभ बसेस, टॅक्सी, तसंच मतदान केंद्रांत जिन्यांवर चढण्यासाठी सरकत्या व्हीलचेअर यांसारख्या सुविधांचा समावेश आहे. या मोफत सुविधा मिळवण्यासाठी दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक मतदारांनी सक्षम ॲपद्वारे आवश्यक मागणी नोंदवावी, असं आवाहन जिल्हाधिकारी तसंच अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव यांनी केलं आहे.

दिव्यांग मतदारांना मदत करण्यासाठी दिव्यांग मित्र समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदानाच्या दिवशी दिव्यांग मतदारांसाठी मुंबईतल्या १० विधानसभा मतदारसंघात मोफत बस सुविधा उपलब्ध असेल.

अंध मतदारांना मतदान प्रक्रियेत कोणाच्याही मदतीशिवाय सहभाग घेता यावा यासाठी ब्रेल चिन्हं असलेली ईव्हीएम देखील उपलब्ध करून दिली जाणार आहेत. अंध मतदारांना ब्रेल लिपीतल्या मतदार स्लिप वाटण्यात येत आहेत.

**<><><><><>**

देशातल्या ११ राज्यातल्या मिळून ३३ विधानसभा मतदारसंघांमधे पोटनिवडणुकीसाठी आज मतदान होत आहे.सकाळी ११ वाजेपर्यंत झालेल्या मतदानाची उपलब्ध झालेली राज्यनिहाय टक्केवारी अशी आहे.

**<><><><><>**

कोणत्याही आरोपीची मालमत्ता नष्ट करून शिक्षा देण्याचा अधिकार सरकारला नाही, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. राज्य सरकारांकडून केल्या जाणाऱ्या बुलडोझर कारवाईविरोधात दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणीवेळी न्यायालयाने आज ही टिप्पणी केली. सरकारकडून अशा प्रकारचं मालमत्तेचं पाडकाम थांबवण्यासाठी न्यायालयाने मार्गदर्शक तत्वं जाहीर केली आहेत. पाडकाम करण्याआधी आरोपीला पूर्वसूचना द्यावी असं न्यायालयाने म्हटलं आहे. या नोटीशीवर आरोपीकडून पंधरा दिवसांच्या आत किंवा स्थानिक प्रशासनाने घालून दिलेल्या कालमर्यादेत उत्तर देणं अपेक्षित आहे. या पाडकामाचं चित्रिकरण करणं, कारवाईचं दस्तऐवजीकरण करणं, जिल्हाधिकाऱ्यांना याचा अहवाल पाठवणं आणि डिजिटल पोर्टलवर कारवाईची माहिती प्रकाशित करणं अनिवार्य आहे, असंही न्यायालयाने म्हटलं आहे.

दरम्यान, कायदेशीर प्रक्रियेशिवाय अशी कारवाई केल्यास ती सरकारची मनमानी समजली जाईल, असं न्यायालयाने म्हटलं आहे. कायद्याचं राज्य या संकल्पनेची आठवण करून देत न्यायालयाने सांगितलं की अपराध सिद्ध होईपर्यंत आरोपीला दोषी मानता येणार नाही, तसंच अशी शिक्षा देणं हे न्यायमंडळ आणि कार्यकारी मंडळाच्या अधिकारांच्या विभाजनाचं उल्लंघन ठरेलं.

**<><><><><>**

भारत आणि दक्षिण अप्रिका संघांदरम्यान आज तिसरा वीस षटकांचा क्रिकेट सामना होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार आज रात्री साडेआठ वाजता सेन्च्युरियन इथल्या सुपरस्पोर्ट पार्क मैदानावर हा सामना सुरू होईल. चार सामन्याच्या या मालिकेत दोन्ही संघांनी प्रत्येकी एक सामना जिंकला आहे.

**//<><><><><>//**